नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक :-११/११/२०१९

**-: परिपत्र :-**

**पुणे महानगरपालिका मुख्य सभेच्या कामकाजाच्या नियमापैकी नियम क्र. १ (के) अन्वये सोमवार दिनांक ११ नोव्हेंबर २०१९ रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता भरलेल्या माहे नोव्हेंबर २०१९ या मासिक सभेच्या कार्यपत्रिकेवर तातडीचे म्हणून दाखल करुन घेण्यात आलेले विषय.**

**विषय क्र.१/७३०**

संदर्भ - १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/६१४ दि. २४/९/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१३५७,दि.३१/१०/२०१९

-----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

मे.महाराष्ट्र राज्य सरकार व म्युनीसीपल कर्जरोखे धारण करणार यांचे माहितीकरिता दि. ३१/३/२०१८ अखेर पुणे महानगरपालिकेने देणे असलेल्या कर्जाच्या रकमांचे व कर्जबाकीसंबंधी इतर माहिती दर्शविणारे तक्ते सरकारी गॅझेटमध्ये प्रसिध्द करणेस व त्यांच्या प्रती मे.महाराष्ट्र सरकार व मा.अकौंटंट जनरल, मुंबई यांचेकडे पाठविण्याची अलहिदा तजवीज करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.२/७३१**

संदर्भ - १) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/५१० दि.११/९/२०१९ चे पत्र
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ११७२ दि. १३/९/२०१९
३) मा.प्रकाश ढोरे व मा.दिलिप वेडेपाटील यांचे दि. ३१/१०/२०१९ चे फेरविचाराचे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४०४,दि.३१/१०/२०१९

-----

मा.स्थायी समिती ठराव क्र. ११७२ दि. १३/९/२०१९ चा फेरविचार करण्यात आला.

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजनेची आर्थिक तरतुद संपुष्टात येत असल्याने सन २०१९-२०२० च्या शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजनेचे कार्डधारक यांच्या कुटुंबियांसाठी औषध उपचाराच्या बिलांच्या प्रति पुर्ततेसाठी खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे र.रू. १५,००,००,०००/- चे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२०२० चे अंदाजपत्रक, आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका | | |
| १)शहरामध्ये सांस्कृतिक भवन, नाटयगृह, कलादालन बांधणे, स्मारके उभारणे व विविध विकास कामे करणे. CE28A160/SJ16-124 20. बालगंधर्व रंगमंदिराचे पुर्ननिर्माण करणे | ५ कोटी | ---- |
| 2) शहरामध्ये स्मारके उभारणे. CE28A226/J26, ४.कोथरूड येथे शिवसृष्टी उभारणे.CE28A196+ | १० कोटी | ---- |
| नविन सुचविलेले काम - | | |
| आरोग्य कार्यालय पुणे महानगरपालिका, RE17F154 | | |
| ७ क रुग्णालये , प्रसुतीगृह औषधालये, क.सेवकांसाठी आरोग्य सहाय्य योजना पुणे शहरातील झोपडट्टीमध्ये राहणारे पिवळे रेशनकार्डधारक/ वार्षीक उत्पन्न र. रु.एक लाखापर्यंतच्या नागरिकांसाठी पुणे मनपातर्फे आरोग्य सहाय्य योजना | ---- | १५ कोटी |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

याबाबत यापुर्वी झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ११७२ दि. १३/९/२०१९ चा दुरुस्त करण्यात येत आहे.

**( टीप - शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजनेबाबतचा विषय क्र.६७२ हा माहे ऑक्टोबर २०१९ च्या कार्यपत्रिकेवर प्रलंबित आहे. )**

<u>विषय क्र.३/७३२</u>

संदर्भ - १) मा.प्रकाश कदम यांचे दि.३१/१०/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४०५,दि.३१/१०/२०१९

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.३८ ड मध्ये विविध विकास कामे करणेसाठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १००, अ.क्र. १२, शहरातील रस्ते कॉंक्रीटने विकसित करणे, (यादी क्र. एसए-१५), पान क्र. १९४, अ.क्र. ६३८, प्रभाग क्र.३८ ड मध्ये वरखडे नगर येथील मुख्य डी.पी.रस्ते कॉंक्रिटीकरण करणे. | २० लाख | --- |
| **<u>नवीन सुचविलेले काम -</u>** | | |
| **१)** प्रभाग क्र.३८ ड मध्ये विविध विकास कामे करणे. | --- | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

<u>विषय क्र.४/७३३</u>

संदर्भ - १) मा.राजु लायगुडे यांचे दि.१७/९/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४११,दि.७/११/२०१९

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.३३ड,मध्ये धायरी परिसर व विविध ठिकाणी मुरूम टाकणेसाठी र.रू. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १००, अ.क्र. ५, शहरात विविध विकासाची कामे करणे, (यादी क्र. एस-१०), पान क्र. १७०, अ.क्र. १४६, प्रभाग क्र.३३ड,मध्ये मनपा अंतर्गत हॉट मिक्स प्लॅन्ट वरून डांबरी मिक्स माल वाहतूक करणे व खड्डे बुजविणे,मनुष्यबळ मशिनरी व तद्नुषंगिक कामे करणे. | १० लाख | --- |
| <u>नवीन सुचविलेले काम -</u> | | |
| प्रभाग क्र.३३ड,मध्ये धायरी परिसर व विविध ठिकाणी मुरूम टाकणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

<u>विषय क्र.५/७३४</u>

संदर्भ - १) मा.सौ.मंजुषा नागपुरे यांचे दि.१८/९/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४१२,दि.७/११/२०१९

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.३४ क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, | | |
| १) १२. भवने, भुमि व मनपा वसाहतीची व्यवस्था, पान क्र.१०२, अ.क्र. १५, शहरात विविध ठिकाणी सिमाभिंत बांधणे, (यादी क्र. एसजे-२२), पान क्र. २५३, अ.क्र.५३, प्रभाग क्रमांक ३४ क मध्ये मातृछाया परिसरात सीमाभिंत विषयक,दुरुस्ती विषयक कामे करणे. | २० लाख | --- |
| 2) १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०२, अ.क्र. ७, शहरात भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे-१०), पान | | |

| | | |
|---|---|---|
| क्र. २४३, अ.क्र. २८५, प्रभाग क्रमांक ३४क मध्ये बाके बसविणे | १० लाख | --- |
| <u>नवीन सुचविलेली कामे –</u> | | |
| १) प्रभाग क्रमांक ३४ क मध्ये ,सिमाभिंत विषयक कामे करणे | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र.३४ क मधील वडगांव बु. स.नं. १२ पार्ट सनसिटी रोडवरील जलतरण तलाव प्रकल्पाच्या विस्तारीकरणाची भवन अंतर्गत कामे करणे | --- | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**<u>विषय क्र.६</u>/७३५**

संदर्भ – १) मा.प्रा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे यांचे दि.१९/९/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४१३,दि.७/११/२०१९

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र.१४ क मध्ये मनपाच्या जागेत समाज मंदिर बांधणेसाठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, | | |
| १) १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०२, अ.क्र. ७, शहरात भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे-१०), पान क्र. २४०, अ.क्र.१२५, प्रभाग क्र.१४ क मध्ये तोफखाना परिसर, साईबाबा मंदिर येथे विविध विकास कामे करणे | १० लाख | --- |
| २) १६.उद्याने, प्राणीसंग्रहालये, पान क्र. १०२, अ.क्र. ५, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, (यादी एसयु-१), पान क्र. २६७, अ.क्र. १२१, प्रभाग क्र.१४क मधील विविध उद्यानात हॉर्टिकल्चर विषयक कामे करणे | १० लाख | --- |
| <u>नवीन सुचविलेले काम –</u> | | |
| प्रभाग क्र.१४ क मध्ये मनपाच्या जागेत समाज मंदिर बांधणे | --- | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**<u>विषय क्र.७</u>/७३६**

संदर्भ – १) मा.अविनाश बागवे, मा.रफीक शेख, मा. विशाल तांबे, मा. अजित दरेकर, मा. अशोक कांबळे, मा.वैशाली मराठे, मा. वनराज आंदेकर, मा. भैय्यासाहेब जाधव, मा. दिलीप बराटे, विरोधी पक्षनेते, मा. अरविंद शिंदे,मा.श्रीमती लता राजगुरु, मा.सौ.सुजाता शेट्टी, मा.सौ.चाँदबी नदाफ यांचे दि. २७/०८/२०१९ चे पत्र
२) मा.पक्षनेता सभेचा दि.१६/९/२०१९ रोजीचा निर्णय
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४३२,दि.७/११/२०१९

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी मराठी भाषेत ३५ कांदब-या, लघुकथा, पटकथा व पोवाडे अशा प्रकारचे साहित्य निर्माण केले. त्यातील काही साहित्य हे अनेक विदेशी व भारतीय अशा ३१ भाषेत प्रकाशित झाले आहे.

साहित्यासोबत स्वातंत्र्य चळवळीत शाहिरीच्या माध्यमातून इंग्रजांविरुध्द लढा देणारे तसेच संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, मुंबई मधील गिरणी कामगारांच्या न्याय व हक्कासाठी केलेले कार्य व गोवा मुक्ती संग्रामात घेतलेली आग्रही भूमिका अशा अनेक कार्यातून देशासाठी, विशेषतः महाराष्ट्राच्या विकासासाठी अमूल्य योगदान देणारे ‘साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे’ यांचे यंदाचे जन्मशताब्दी वर्ष आहे. सबब राज्य शासनाकडून ‘साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊसाठे’ यांचे जन्मशताब्दी वर्षानिमित्त अनेक कार्यक्रम होत आहेत.

पुणे महानगरपालिकेकडून विविध समाज पुरुषांच्या नावाने अनेक पुरस्कार दरवर्षी देण्यात येतात. त्याच पध्दतीने ‘साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे’ यांचे यंदाचे जन्मशताब्दी वर्ष असल्याने पुणे महानगरपालिकेकडून ‘साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार’ चालू करण्यास तसेच सदर पुरस्कार हा दलित चळवळीत कार्य करणाऱ्यांस रोख रक्कम सन्मानचिन्ह देवून सन्म:नित करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्र.८/७३७</u>

संदर्भ - १) मा. धनराज घोगरे यांचे दिनांक ३०/७/२०१८ रोजीचे पत्र

२) मा.पक्षनेता सभेचा दि.१६/९/२०१९ रोजीचा निर्णय

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४३३,दि.७/११/२०१९

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र. २५ अ वानवडी येथील रहिवासी कै. यशवंत प्रभाकर सिधये उर्फ बाबा हे जन्मतः अपंग असुन ते एक उत्तम क्रिकेटपटु म्हणून ओळखले जातात. क्रिकेट क्षेत्रामध्ये त्यांनी फार मोठया प्रमाणात उत्तम कामगिरी केलेली असून त्यांच्या नावे विश्वविक्रमाचीही नोंद आहे. सदर जगातील एकमेव व जन्मतः अपंग क्रिकेटपटु कै. यशवंत प्रभाकर सिधये यांच्या कामगिरीची नोंद लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड, WHRPA, Wings of united nations organizations, विश्व मानवाधिकार सुरक्षा संघ, World human rights association इ. संस्थांनी घेऊन त्यांना गौरविलेले आहे. वानवडी मधील एका रस्त्याला ही त्यांचे नाव देण्यात आलेले आहे.

तरी सदर क्रिकेटपटु कै. यशवंत प्रभाकर सिधये उर्फ बाबा सिधये यांना त्यांच्या उत्तुंग कामगिरीची दखल घेऊन मरणोत्तर पुणे महानगरपालिकेचा उच्चतम पुरस्कार देऊन गौरविण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्र.९/७३८</u>

संदर्भ - १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/साप्रवि/आस्था-४/६१५ दि.२४/९/२०१९ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४३५,दि.७/११/२०१९

-----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील सन २०११ चे सुधारणेनुसार स्पष्टीकरणामध्ये- वेतनमान किंवा वेतन संरचना यांतील कोणतीही सुधारणा किंवा विशेष वेतन किंवा श्रेणी देण्याबाबत किंवा भत्यांतील सुधारणा (महागाई भत्ता वगळून) किंवा पदनामातील बदल हे पोट कलम (४) च्या प्रयोजनार्थ नवीन पदांची निर्मिती असल्याचे मानण्यात येईल. असे निर्देशित केले आहे.

अधिनियमातील मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद तरतुदीनुसार मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडील 'कनिष्ठ अभियंता, वर्ग-३' या वर्गातील एकूण १० मंजूर पदांना मोटार सायकल भत्ता (पेट्रोल भत्ता) मे.शासन मान्यतेच्या दिनांकापासून अनुज्ञेय करणेस व तसा प्रस्ताव मे.राज्य शासनाचे मंजुरीस सादर करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्र.१०/७३९</u>

संदर्भ - १) मा.मारुती सांगडे यांचे दि.१/११/२०१९ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४३८,दि.७/११/२०१९

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.१ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, ९.पथांची झाडलोट/घनकचरा व्यवस्थापन विभाग, पान क्र. ९८, अ.क्र. १६, शहरात घनकचरा संदर्भात शहरात विविध विकास कामे करणे, (यादी एसएच-१), | | |
| १) पान क्र. २६३, अ.क्र. १, प्रभाग क्रमांक १ ब ओला-सुका कच-यासाठी हँगिंग कंटेनर बीन्स खरेदी करणे | १० लाख | --- |
| १) पान क्र. २६३, अ.क्र. २, प्रभाग क्रमांक १ ब मध्ये ओला व सुका कचऱ्यासाठी हँगिंग कंटेनर बीन्स खरेदी करणे | १० लाख | --- |
| <u>नवीन सुचविलेली कामे-</u> | | |
| १) प्रभाग क्र.१ ब मध्ये कळस धानोरी मध्ये विविध ठिकाणी भिंतीवर पाणीरोधक व सहज स्वच्छ होणाऱ्या लेपासह असणारी मुद्रीत माध्यमे वापरुन विविध संदेश | | |

लावणे --- १० लाख

२) प्रभाग क्र.१ ब मध्ये धानोरी, विश्रांतवाडी, कळस मध्ये विविध ठिकाणी भिंतीवर पाणीरोधक व सहज स्वच्छ होणाऱ्या लेपासह असणारी मुद्रीत माध्यमे वापरुन विविध संदेश लावणे --- १० लाख

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.११/७४०**

संदर्भ - १) मा.धीरज घाटे यांचे दि.४/११/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४३९,दि.७/११/२०१९

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.२९ ड मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, १६.उद्याने, प्राणीसंग्रहालये, पान क्र. १०२, अ.क्र. ५, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, (यादी एसयु-१), पान क्र. २६९, अ.क्र. २०८, प्रभाग क्र.२९ ड छत्रपती शिवाजी महाराज उद्यानालगत असणारी पी.एम.पी.एल.ची जागा विकसीत करणे. | २० लक्ष | - |
| **नविन सुचविलेली कामे-** | | |
| १) प्रभाग क्र. २९ ड मध्ये दत्तवाडी येथे समाजमंदिर बांधणे | - | १० लक्ष |
| २) प्रभाग क्र. २९ ड मध्ये विविध ठिकाणी केबल अंडरग्राउंड करणे. | - | १० लक्ष |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.१२/७४१**

संदर्भ - १) मा.आनंद आलकुंटे यांचे दि.७/११/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४४०,दि.७/११/२०१९

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.२४ क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. ९० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२०२० चे अंदाजपत्रक | | |
| १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १००, अ.क्र. १२, शहरातील रस्ते कॉंक्रीटने विकसित करणे, (यादी क्र. एसए-१५), | | |
| १) पान क्र.१८८,अ.क्र.३३२, प्र.क्र.२४ क भोरी पडळ येथे विविध ठिकाणी कॉंक्रीट करणे. | १० लाख | --- |
| २) पान क्र.१८८,अ.क्र.३४६, प्र.क्र.२४ क गोसावी वस्ती येथे मनपा शाळेमागे विविध ठिकाणी कॉंक्रीट करणे | १० लाख | --- |
| ३) पान क्र.१८८,अ.क्र.३५५, प्र.क्र.२४ क वैदुवाडी मनपा शाळेसमोर विविध ठिकाणी कॉंक्रीट करणे. | १० लाख | --- |
| ४) पान क्र.१८८, अ.क्रं.३६३, प्र.क्रं.२४ क मर्थनगर येथे विविध ठिकाणी कॉंक्रीट करणे.भाग-२ | १० लाख | --- |
| ५) पान क्र.१८८, अ.क्र.३६४, प्र.क्र.२४ क म्हाडा कॉलनी बिल्डींग नं.१ व २ येथे विविध ठिकाणी कॉंक्रीट करणे. | १० लाख | --- |
| ६) पान क्र.१८८, अ.क्र.३६५, प्र.क्र.२४ क म्हाडा कॉलनी बिल्डींग क्र. ३ व ४ येथे विविध ठिकाणी कॉंक्रीट करणे. | १० लाख | --- |
| ७) पान क्र.१८८, अ.क्र.३६८, प्र.क्र.२४ क म्हाडा कॉलनी बिल्डींग नं.९ व १० येथे कॉंक्रीट करणे. | | |
| ८) १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १००, अ.क्र. ५, शहरात विविध विकासाची कामे करणे, | १० लाख | --- |
| (यादी क्र. एसए-१०), पान क्र.१६९, अ.क्र.१०५, प्र.क्र.२४ क वैदुवाडी रेल्वेगेट समोरील महानगरपालिकेच्या जागेवर विविध विकास कामे करणे. | १० लाख | --- |
| ९) १०.ख.वाहतूक नियंत्रण विभाग, पान क्र. १००, अ.क्र. २, शहरामधील चौकांची सुधारणा/विकास कामे करणे, वाहतुक सुधारण्यासाठी विविध विकास कामे करणे, (यादी क्र. एसटी-२), पान क्र.२०३, अ.क्रं.१५७, प्र.क्रं.२४ क सुरक्षानगर येथील चौकात सुशोभिकरण करणे. | १० लाख | --- |

नविन सुचविलेली कामे–

| | | |
|---|---|---|
| १) प्रभाग क्र.२४ क मध्ये रस्ते डांबरीकरण करणे | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र.२४ क मध्ये रामटेकडी इंडस्ट्रीअल इरिया मध्ये रस्ते डांबरीकरण करणे | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र.२४ क मध्ये नाल्याची विविध विकास कामे करणे | --- | १० लाख |
| ४) प्रभाग क्र.२४ क सय्यदनगर व परिसरात रस्ते डांबरीकरण करणे | --- | १० लाख |
| ५) प्रभाग क्र.२४ क सय्यदनगर परिसरात रस्ते डांबरीकरण करणे | --- | १० लाख |
| ६) प्रभाग क्र.२४ क लोहिया उदयान मागील नाले विषयक कामे करणे | --- | १० लाख |
| ७) प्रभाग क्र.२४ क सय्यदनगर,रामटेकडी मधील नाले विषयक कामे करणे. | --- | १० लाख |
| ८) प्रभाग क्र.२४ क इंडस्ट्रीअल परिसरात रिइन्सटेटमेंट व डांबरीकरण करणे | --- | १० लाख |
| ९) प्रभाग क्र.२४ क म्हाडा कॉलनी परिसरात रिइन्सटेटमेंट व डांबरीकरण करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.१३/७४२**

संदर्भ – १) मा.महेश वाबळे यांचे दि.६/११/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४४१,दि.७/११/२०१९

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. ३५ ड मध्ये विविध ठिकाणी ज्येष्ठ नागरिकांसाठी शेड बांधणेसाठी र.रु. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, १९.भाजी मंडया व पशुवधगृहे, पान क्र. १०४, अ.क्र. ७, शहरामध्ये भाजी मंडई, ओटा मार्केट, मटन मार्केट बांधणे, भाजी मंडयामध्ये विकास कामे करणे (यादी एसजे-२९), पान क्र. २६२, अ.क्र. १७, प्रभाग क्र.३५ ड मध्ये भाजी मंडई बांधणे | १० लाख | --- |
| नवीन सुचविलेले काम– | | |
| प्रभाग क्र. ३५ ड मध्ये विविध ठिकाणी ज्येष्ठ नागरिकांसाठी शेड बांधणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.१४/७४३**

संदर्भ – १) मा.महेश वाबळे यांचे दि.६/११/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४४२,दि.७/११/२०१९

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. ३५ ड मध्ये विविध विकास कामे करणेसाठी र.रु. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, १६.उद्याने, प्राणीसंग्रहालये, पान क्र. १०२, अ.क्र. ५, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, (यादी एसयु-१), पान क्र. २७०, अ.क्र. २७३, प्रभाग क्र.३५ ड मध्ये गोवर्धन सोसायटी येथील उद्यान विकसित करणे | १० लाख | --- |
| नवीन सुचविलेले काम– | | |
| प्रभाग क्र. ३५ ड मध्ये विविध विकास कामे करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.१५/७४४**

संदर्भ – १) मा.आबा बागुल यांचे दि.७/११/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४४३,दि.७/११/२०१९

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. ३५ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.२५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, १७.खेळ, क्रीडांगणे, पान क्र. १०२, अ.क्र.७, शहरामध्ये क्रिडासंकुल, स्टेडियम बांधणे, क्रीडांगणे, मैदाने विकसित करणे, पोहोण्याचे तलाव बांधणे व विविध विकास कामे करणे (यादी क्र. एसजे-२४), पान क्र.२५८, अ.क्र.१०२, प्रभाग क्र. ३५ ब मधील बागुल उद्यानासमोरील क्रीडा संकुल दुरूस्ती व विविध विकास कामे करणे. | २५ लाख | --- |
| <u>नवीन सुचविलेली कामे-</u> | | |
| १)प्रभाग क्र. ३५ ब मधील राजीव गांधी ई लर्निंग शाळेमधील सर्व मजल्यावरील शौचालय दुरूस्त करणे व इतर कामे करणे. | --- | १० लाख |
| २)प्रभाग क्र. ३५ ब मधील राजीव गांधी ई लर्निंग शाळेमध्ये विविध ड्रेनेज विषयक कामे करणे. | --- | १० लाख |
| ३)प्रभाग क्र. ३५ ब मधील राजीव गांधी ई लर्निंग शाळेमध्ये विविध विकास कामे करणे. | --- | ५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

<u>**विषय क्र.१६/७४५**</u>

संदर्भ - १) मा.हेमंत रासने व मा.राजेश येनपुरे यांचे दि.७/११/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४४४,दि.७/११/२०१९

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र. १५ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. २७.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, | | |
| १) १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०२, अ.क्र. ७, शहरात भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे-१०), पान क्र.२४०, अ.क्र.१३२, प्रभाग क्र. १५ अ मध्ये शनिवारवाडा येथे सेल्फी पॉईंट उभारणे. | १० लाख | --- |
| २) १८.सांस्कृतिक केंद्रे, पान क्र. १०४, अ.क्र.१, शहरामध्ये सांस्कृतिक भवन, नाटयगृह कलादालन बांधणे, स्मारके उभारणे व विविध विकास कामे करणे (यादी क्र.जे-१६), पान क्र.२५९, अ.क्र.११, प्रभाग क्र. १५ अ शनिवारवाडा येथे बाजीराव पेशवे पुतळयास मेघडंबरी बसविणे व इतर तद्नुषंगिक कामे करणे. | १७.५० लाख | --- |
| <u>नवीन सुचविलेली कामे-</u> | | |
| १) प्रभाग क्र. १५ अ शुक्रवार पेठ व्हाईट हाऊस ते स्वामी समर्थ मंदिर दरम्यान कॉंक्रीटीकरण करणे. | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र. १५ अ मध्ये सदाशिव पेठ, बुधवार पेठ, शुक्रवार पेठ व प्रभागात विविध ठिकाणी वाहतुक विषयक कामे करणे. | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र. १५ अ मध्ये ड्रेनेज दुरूस्ती व साफ-सफाई विषयक कामे करणे. | --- | ७.५० लाख |

<u>**विषय क्र.१७/७४६**</u>

संदर्भ - १) मा.सौ.आरती कोंढरे, मा.अजय खेडेकर, मा.सम्राट थोरात व मा.सौ.विजयालक्ष्मी हरिहर यांचे दि.७/११/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४४५,दि.७/११/२०१९

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र. १८ ब मधील विविध ठिकाणचे मुता-या व शौचालय दुरूस्त करणेसाठी र.रु. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, १६.उद्याने, प्राणीसंग्रहालये, पान क्र. १०२, अ.क्र. ५, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, (यादी एसयु-१), पान क्र. २७१, अ.क्र. ३१७, प्रभाग क्र. १८ मध्ये विविध ठिकाणी झाडे लावणे व जाळया पुरविणे | १० लाख | --- |
| नवीन सुचविलेले काम- | | |
| प्रभाग क्र. १८ ब मधील विविध ठिकाणचे मुता-या व शौचालय दुरूस्त करणे | --- | १० लाख |

**विषय क्र.१८/७४७**

संदर्भ - १) मा.मारुती तुपे यांचे दि.७/११/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४४६,दि.७/११/२०१९

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र. २३ ड मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. १ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, १२. भवने, भुमि व मनपा वसाहतीची व्यवस्था, पान क्र.१०२, अ.क्र. १५, शहरात विविध ठिकाणी सिमाभिंत बांधणे, (यादी क्र. एसजे-२२), पान क्र. २५३, अ.क्र. २८, प्रभाग क्र.२३ ड मध्ये काळे बोराटे नगर येथे तुकाई टेकडी परिसरात स.नं.३४/२/३ येथे क्रीडा संकुल व सीमाभिंत बांधणे | १ कोटी | --- |
| नवीन सुचविलेली कामे- | | |
| १) प्रभाग क्र.२३ ड ससाणेनगर,काळे बोरोटे नगर रोड वरील मनपा जागेवर सेमी इंग्लिश शाळा इमारतीचे उर्वरित काम करणे. | --- | ५० लाख |
| २) प्रभाग क्र.२३ ड मध्ये दवाखाना विकसित करणे व उर्वरित कामे करणे. | --- | २५ लाख |
| ३) प्रभाग क्र.२३ ड मध्ये ई लर्निंग शाळेच्या इमारतीचे उर्वरित काम करणे. | --- | २५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.१९/७४८**

संदर्भ - १) मा.विजय शेवाळे व मा.प्रकाश ढोरे यांचे दि.७/११/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४४७,दि.७/११/२०१९

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.८ क पताशीबाई छाजेड मनपा शाळा, बोपोडी मध्ये ई-लर्निंग स्कूल अनुषंगाने विविध विकास कामे करणेसाठी र.रु. ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, १०.घ.पूल व नदी सुधारणा (विकास योजना), पान क्र.१००, अ.क्र.३, शहरात विविध ठिकाणी पूल बांधणे, उड्डाणपूल बांधणे, भुयारी मार्ग करणे, (यादी क्र. एसएल १), पान क्र.२२१, अ.क्र.२, प्रभाग क्रमांक ८ क मधील स्पायसर कॉलेज रस्ता येथे पादचारी पूल तयार करणे | ५० लाख | --- |
| नवीन सुचविलेले काम- | | |
| प्रभाग क्र.८ क पताशीबाई छाजेड मनपा शाळा, बोपोडी मध्ये ई-लर्निंग स्कूल अनुषंगाने विविध विकास कामे करणे | --- | ५० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.२०/७४९**

संदर्भ - १) मा.दिलिप वेडेपाटील यांचे दि.७/११/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४४८,दि.७/११/२०१९

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र. १० ड बावधन खुर्द येथे उद्यान विकसित करणेसाठी र.रु. २५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, बजेट कोड नं. CE20A102/SA2-2361, प्रभाग क्र. २८ ब सॅलिसबरी पार्क, महर्षीनगर,मुकुंदनगर,प्रेमनगर,संदेश सोसायटी परिसर व विविध ठिकाणी पेव्हरणे डांबरीकरण करणे | २५ लाख | --- |
| नवीन सुचविलेले काम | | |
| प्रभाग क्र. १० ड बावधन खुर्द येथे उद्यान विकसित करणे | --- | २५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.२१/७५०**

संदर्भ - १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्रकल्प)/६७३ दि.६/११/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४४९,दि.७/११/२०१९

-----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

सिंहगड रस्त्यावर राजाराम पूल ते फन टाईम थिएटर पर्यंत उड्डाणपूल बांधणे या कामासाठी आर्थिक तरतुद उपलब्ध करणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१)सिंहगड रस्त्यावर राजाराम पूल ते फन टाईम थिएटर पर्यंत उड्डाणपूल बांधणे या कामाकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ७२(ब) प्रमाणे र.रू. १२० कोटी इतकी प्रकल्पीय तरतूद करणेस.

२)सदर कामाकरीता सन २०२०-२१, २१-२२ व २२-२३ या आर्थिक वर्षांमध्ये टप्प्याटप्प्याने तरतूद करणेस.

**विषय क्र.२२/७५१**

संदर्भ - १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्रकल्प)/६७४ दि.६/११/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४५०,दि.७/११/२०१९

-----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

मुंबई-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ वर पाषाण-सुस येथे उड्डाणपूल बांधणे या कामासाठी आर्थिक तरतुद उपलब्ध करणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) मुंबई-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ वर पाषाण-सुस येथे उड्डाणपूल बांधणे या कामाकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ७२(ब) प्रमाणे र.रू. ४५ कोटी इतकी प्रकल्पीय तरतूद करणेस

२)सदर कामाकरीता सन २०२०-२१, २१-२२ व २२-२३ या आर्थिक वर्षांमध्ये टप्प्याटप्प्याने तरतूद करणेस

३)भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांना त्यांनी दिलेल्या परवानगी प्रमाणे प्लॅन व एस्टीमेशन चार्जेस पोटी र.रू. ५.०० लक्ष अनामत म्हणून अदा करणेस

४)भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे समवेत समजुतीचा करारनामा (MoU) करणेस व त्यासाठी आवश्यक मुद्रांक शुल्क शासनास अदा करणेस.

**विषय क्र.२३/७५२**

संदर्भ - १) मा. आमदार श्रीमती माधुरी सतिश मिसाळ, विधान सभा, महाराष्ट्र राज्य यांचे या कार्यालयाकडे आ.क्र.४३६९, दि.८/३/१९ चे पत्र.
२) मुख्य अभियंता (पथ) कार्यालयाकडील जा.क्र. पथ ३०६०, दि.२५/७/२०१९ चे पत्र.
३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भूसंपादन व्यव./६७५ दि.६/११/२०१९ चे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४५१,दि.७/११/२०१९

-----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

मौजे हिंगणे खुर्द, ता.हवेली जि. पुणे स.नं.३३(पै) या मिळकतीपैकी १२.०० मी.डी.पी. रस्त्याने बाधित जागेचे भूसंपादन कायद्यान्वये अथवा तडजोडीने भूसंपादन करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.२४/७५३**

संदर्भ – १) मा. महापालिका आयुक्त जा.क्र.मआ/माव्य/८२८, दि.१५/१२/२०१८ चे पत्र
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. ३४० दि.१०/1/२०१९
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४५२,दि.७/११/२०१९

-----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे पेठ शिवाजीनगर मॉर्डन हायस्कुल समोरील भुयारी मार्गामधील गाळा क्र. ४ ताबा दिनांकापासून ३ वर्षाच्या कालावधीसाठी लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्स तत्वांवर देणेसाठी निविदा मागविण्यात आल्या असता आलेल्या २ निविदांपैकी सर्वात जास्त दर देणारे निविदाधारक श्री किशोर वसंत कार्ले, रा.स.नं. २४/२५, श्रमसाफल्य सोसायटी, पुणे – मुंबई रोड, खडकी, पुणे – ४११००३, यांनी देऊ केलेली मासिक रक्कम रुपये ३६०/– (अक्षरी रक्कम रु. तीनशे साठ फक्त) ही मनपा निर्धारीत मासिक रक्कम रुपये २८१/– (अक्षरी रक्कम रु. दोनशे ऐक्याऐंशी फक्त) पेक्षा रक्कम रुपये ७९/– (अक्षरी रक्कम रु. एकोणऐंशी फक्त) ने जास्त असल्याने त्याप्रमाणे ताबा दिनांकपासून ३ वर्षे कालावधीपासून टेंडर अटी व शर्तीप्रमाणे लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्स तत्वांवर देणेस तसेच शासकीय नियमानुसार प्रतिवर्षी मक्ता रकमेवर वस्तु आणि सेवाकर प्रचलित दराने भरुन घेणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७९ व मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतुदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता दयावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.२५/७५४**

संदर्भ – १) मा.प्रमोद भानगिरे यांचे दि.२७/८/२०१९ चे पत्र
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. १६२ दि.१६/९/२०१९
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४५३,दि.७/११/२०१९

-----

मा.शहर सुधारणा समितीची शिफारस विचारात घेवून ...

योगा उपासना ट्रस्ट, पुणे व्दारा–नागेश विष्णु बढे,स.नं.१६५, माळवाडी,हडपसर, पुणे २८ ही एक रजिस्टर्ड संस्था असून क्रिडा क्षेत्रातील सर्व प्रकारच्या खेळांच्या स्पर्धांचे आयोजन करणेत सदर संस्थेचा मोलाचा वाटा आहे.

पुणे महानगरपालिकेचे स.नं.७३, हडपसर, पुणे या ठिकाणी क्रिडा उपक्रमासाठी राखीव विरंगुळा कला केंद्र असून सध्या तेथे कोणताही उपक्रम राबविला जात नाही. या परिसरात अनेक गोरगरीब लहान मुले असून त्यांना व्यायाम व क्रिडा उपक्रमासाठी कोणतेही साधन उपलब्ध नाही.

तरी सदरची क्रीडा उपक्रमासाठी राखीव असलेली जागा योगा उपासना ट्रस्ट, पुणे यांना नाममात्र भाडयाने व ५ वर्षे कालावधीसाठी क्रिडा उपक्रमासाठी वापरण्यास देण्यास मान्यता दयावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.२६/७५५**

संदर्भ – १) मा.प्रमोद (नाना)भानगिरे व मा.विशाल धनवडे यांचे दि.२२/८/२०१९ चे पत्र
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. १६३ दि.१६/९/२०१९
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४५४,दि.७/११/२०१९

-----

मा.शहर सुधारणा समितीची शिफारस विचारात घेवून ...

प्रभाग क्र.२६ महंमदवाडी कौसरबाग, येथील महंमदवाडी स.नं.४३ येथील जागेवर शाळेचे रीझरव्हेशन असून ही जागा BADRIYA EDUCATION TRUST ( बदरिया एज्युकेशन ट्रस्ट) या ट्रस्टला भाडे तत्वावर देण्यास मान्यता दयावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**सुनील पारखी**
**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**